**स.फौ.के. नं. २१४/२०२४**

**नि. क्र. २०**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ चा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**नाव** – वैभव बापु नटे,

**वय** – ३५ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (पोलीस शिपाई/९४),

**सध्या नेमणूक** – चिपळुन महामार्ग मदत केंद्र, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u> –**

**०१**. दिनांक २१/०७/२०२४ रोजी मी पोलीस ठाणे देवरुख अंतर्गत असलेल्या साखरपा पोलीस दूरक्षेत्र येथे चालक या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी पो.ह./१०२७ श्री. जाधव यांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजे ओझरे बुद्रुक येथे विष्णू रामचंद्र कांबळे हा गावठी दारुचा अवैध व्यवसाय चालवितो.

**०२**. त्यावरुन पोलीस निरीक्षक मुजावर मॅडम यांच्या मादर्गदशनाखाली मी, पो.ह./१०२७ श्री. जाधव व पोलीस हवालदार श्री. करांडे असे आम्ही हालचाल नोंदवहीला नोंद करुन छापा टाकणेकामी आवश्यक ती साहित्य घेवुन सरकारी वाहन क्र. एमएच–०८–एएक्स–७१०३ ने निघालो.

**०३**. आम्ही ओझरे बुद्रुक येथील बौध्दवाडी रस्त्याला एका बाजूला आमचे वाहन उभे केले. तेथे दोन इसमांना पंच म्हणून बोलावले. त्यांना छाप्याबाबत माहिती दिली. त्यानंतर पंच व आम्ही पोलीस असे आम्ही बौध्दवाडी ओझरे बुद्रुक येथे विष्णू रामचंद्र कांबळे यांच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्याने लक्ष ठेवून पायी निघालो. त्यावेळी, विष्णु कांबळे यांच्या घराशेजारी एक इसम त्याच्या पुढयात प्लॅस्टीकच्या ०२ बाटल्या व ०१ ग्लास घेवून बसलेला आम्हाला दिसला. आम्हाला त्याचा संशय आला. आम्ही त्याला जागीच रात्री ०८:०० वाजता धरले. आम्ही त्याच्याकडील बाबींची पाहणी केली असता त्याच्या ताब्यात प्रत्येकी ०२ लिटर मापाच्या ०२ बाटल्या व ०१ काचेचा पेला मिळून आला. आम्ही त्या बाटल्यांची खात्री केली असता त्या गावठी दारुने भरलेल्या होत्या.

०४.　　आम्ही पंचांसमक्ष त्या इसमाला त्याचे नाव–गाव विचारले असता त्याने त्याचे नाव विष्णु रामचंद्र कांबळे, राहणार – ओझरे बुद्रुक, बौध्दवाडी, असे सांगितले.

०५.　　त्याठिकाणी पो.ह./१०२७ श्री. जाधव यांनी पंचांसमक्ष १८० मिली क्षमतेच्या एका बाटलीत मिळून आलेल्या मुद्देमाल दारुपैकी काही दारु रासायनिक पृथःकरणाकरीता काढून घेतली. त्या नमूना बाटलीला व प्रत्येकी ०२ लिटरच्या त्या दोन्ही बाटल्यांना पंचांच्या व पोलीसांच्या सहयांचे लेबल चिकटविले. त्याठिकाणी मिळून आलेला मुद्देमाल ताब्यात घेतला. तेथे त्याबाबत पंचांसमक्ष पंचनामा केला.

०६.　　त्यावेळी मी माझ्या खाजगी मोबाईलवर छायाचित्रे घेवुन त्याची प्रींट तपास अधिकारी यांच्याकडे भा.पु.का.कलम ६५–ब अन्वये प्रमाणपत्रासह जमा केले. *(साक्षीदारास प्रकरणातील छायाचित्रे दाखविण्यात आली). त्यामध्ये आरोपी, दोन पंच, फिर्यादी व तपासीक अंमलदार असे दिसत आहेत. (सदर **छायाचित्रांना ओळखीकरीता एकत्रीतपणे वस्तु – अ** देण्यात येते). (साक्षीदारास भा.पु.का.कलम ६५–ब अन्वये प्रमाणपत्र दाखविण्यात आले). ते तेच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.(सदर **दस्ताला निशाणी क्रमांक २१** देण्यात येते).*

०७.　　त्यानंतर आम्ही मिळून आलेल्या मुद्देमालासह पोलीस दूरक्षेत्र साखरपा येथे परत आलो. तेथे आल्यावर पो.ह.श्री. करांडे यांनी आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली.

०८.　　आरोपी व मुद्देमाल दाखविल्यास मी ओळखू शकते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. *(मुद्देमाल न्यायालयात जमा नाही).*

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेकडून –**

०९.　　हे म्हणणे खरे आहे की, माझे त्यावेळी केवळ चालक म्हणुन काम करण्याचे कर्तव्य होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे कोणत्याही तपासकामात सहभाग घेण्याचा मला अधिकार नाही. तपासीक अधिकाऱ्यांनी माझ्याकडे त्याचदिवशी चौकशी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, छाप्याकामी निघण्यापुर्वी सदर वाहनाचे किती किलोमीटर रनिंग

झाले होते, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घर कोणाचे होते व तथाकथीत दोन पंचांची नावे, हे मला सांगता येणार नाही.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, मोबाईल मालकीचा कोणताही पुरावा मी तपासीक अधिकारी यांच्याकडे दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २१ कडील प्रमाणपत्रात माझ्या मोबाईलचा आयईएमआय क्रमांक नमुद करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, संगणकीय ज्ञान असलेबाबत मी कोणताही पुरावा तपासीक अधिकारी यांना दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रींटर त्यावेळी चालु स्थितीत होता व कोणाच्या नियंत्रणात होता, ही बाब मी निशाणी क्र. २१ कडील प्रमाणपत्रात नमुद केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे प्रमाणपत्र कायद्यानुसार विहित नमुण्यात देण्यात आले नाही. साक्षीदार सांगतो की, सदरचे प्रमाणपत्र माझ्या माहितीनुसार देण्यात आले होते.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, सदरचे प्रमाणपत्र तपासिक अधिकारी यांनी टंकलिखीत करुन आणले होते व मी त्यावर केवळ सही केली. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.03.11 14:45:46 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,**
**जि. रत्नागिरी.**

**दिनांक –१०.०३.२०२६**
**स्थळः देवरुख**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 10/03/2026 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 10/03/2026 |
| Evidence uploaded on | : | 10/03/2026 |